# निवेदन

लातूर विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरतीचा जाहिरात क्रमांक जा.क्र.विकृससं/आस्था-२/कृसे भरती-२०१९/जाहिरात/६६/२०१९ दिनांक ३ जानेवारी,२०१९ चे जाहिरातीनुसार दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ या कालावधीमध्ये ऑनलाईन द्वारे विविध केंद्रावर परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकाल प्राप्त झाला असून त्यानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २३.०८.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये नाव नसल्याबाबत व गुणांमध्ये तफावत असल्याबाबत काही उमेदवारांनी लेखी तसेच दुरध्वनीवरुन या कार्यालयास आक्षेप सादर केले होते. सदर बाब विभागाच्या निदर्शनास आणली असता महापरीक्षा कक्षाकडून कृषि सेवक परिक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या गुणांकन यादीबाबतच्या प्राप्त सुधारीत छोटी सी.डी.च्या आधारे सुधारीत सर्वसाधारण अंतरीम गुणवत्ता यादी व निवेदन www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. प्राप्त आक्षेपांची पुर्तता करुन सुधारीत अंतीम गुणवत्ता यादी व अंतरीम निवड यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर अंतरीम निवडयादी व प्रतिक्षायादीबाबत उमेदवारांचे प्राप्त आक्षेपांचे अनुषंगाने प्राप्त आक्षेप/निवेदनांचा प्रचलित शासननिर्णयानुसार विचार करुन अंतीम निवडयादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतीम निवडयादी व प्रतिक्षायादी ही गुणवत्तायादीनुसार गुणानुक्रमे तयार करण्यात आलेली असून कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

**विभागीय कृषि सहसंचालक**
**लातूर विभाग लातूर**